ANNEXURE-II

# MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK

## INFRASTRUCTURE DETAILS OF COLLEGE AND HOSPITAL

| Sr. No. | Particulars to be verified | Details on College Website | Adequate/ Inadequate |
|---|---|---|---|
| | **College** | | |
| 1 | **Land details** (as per M.S.R.): Total land (Not less than 2 acres), (Owned or leased land), unitary or not, NA of all land, 7/12 extracts of all land, Constructed Area Details **40339.24** Sq.ft./Sq.mtr. **(Applicable only to Private Colleges).** (Verify land documents & Government permissions documents are uploaded on College Website.) (No Land/ Construction documents shall be submitted to the University. Only deficit information to be pointed out to the University). | Yes | Adequate |
| 2 | Dean office, Professor's Office, Associate Professor's Office, Assistant Professor's Office , Administrative Block as per M.S.R.. | Yes | Adequate |
| 3 | **All DEPARTMENTS** (as per M.S.R.): Human Anatomy, Human Physiology, Electrotherapy & Electrodiagnosis, Kinesiotherapy & Physical Diagnosis, Musculoskeletal Physiotherapy, Neuro Physiotherapy, Cardiovascular & Respiratory Physiotherapy, Community Physiotherapy | Yes | Adequate |
| 4 | **College Library** (as per M.S.R.): Area (1200 Sq.Ft.), Reading Rooms for Students, Staff Reading Room, Room for Books & Journals, Rooms for Librarian and Other Staff; Journal Room, Number of Computers with internet facility with minimum 15 nodes, Photocopier Machine, Total No. of books, Number of Journals: (Titles only), (Multiple volumes / issues of one title should be counted as ONE). | Yes | Adequate |
| | **No. of books added in last year:** **No. of Journals titles added in last year** : [Bills shall be verified by the Committee.] | Yes | Adequate |
| | **Digital Library /e – Library availability** | Yes | |
| 5 | **Details of all Lecture Theatres with Seating Capacity** (as per M.S.R.) along with AV Aids including overhead projector, LCD Projector and a microphone / multi Podium system. There shall be provision for E-class. Lecture halls must have facilities for conversion into E-class/Virtual class for teaching. | Yes | Adequate |
| 6 | **Conference Room for Faculty:** (as per M.S.R.) | Yes | Adequate |
| 7 | **Mini Auditorium: (15 Sq.Ft./Student)** (as per M.S.R.) | Yes | Adequate |
| 8 | **Class Rooms: (15 Sq.Ft./Student)** (as per M.S.R.) | Yes | Adequate |
| 9 | **Core Laboratories: (50 Sq.Ft./Student)** (as per M.S.R.) **Exercise Physiology & Fitness :** Computerized Treadmill, Bicycle ergometer with speedometer, Skin fold caliper, Body composition analyzer, Weighing scale with height measurement, Spirometer, Peak flow meter, Energy Consumption analyzer, Pulse Oxymeter, ECG, Flutter, Inspiratory Muscle Trainer, Oxygen Cylinder, Nebulizer (ultrasonic), Nebulizer (Jet), Portable Suction Machine, B.P. Apparatus & Stethoscope, Shuttle Walk Test Software (Desirable). | Yes | Adequate |
| 10 | **Physiotherapy Museum:** (as per M.S.R.) (Desirable) | Yes | |
| 11 | **Yoga / Clinical Skill Laboratory: (60 Sq.Ft./Student)** (as per M.S.R.) Yoga Mats / Pediatric Mats / Mats for Training Neurotherapeutic Skills, Adjustable Manual Therapy Plinth, Therabands & Theratubes, Swiss balls, Stability Trainers, Sensory Assessment Kit, Balance Assessment & Training Equipment, Stools, Benches, Wheel Chairs, Stairs, Ramps For Training Transfers. | Yes | Adequate |
| 12 | **University Examination Infrastructure:** Strong Room for examination a) (Area- 1200 sq.ft, b) Shelf, c) Steel cupboard – 1, d) CCTV, Photocopier Machine, Examination hall with benches, Parking Facility for University vehicle, Guest house facility | No | |



Scanned with OKEN Scanner

| 13 | **Residential quarter facility for staff:** Teaching, Non-teaching, Paramedical & Nursing staff | Yes | Adequate |
|---|---|---|---|
| 14 | **Other facilities:** Hospital Waste Management Unit, Research Cell, Intercom Network, Playground, P.T Teacher or Instructor, Common Rooms for Boys, Common Room for Girls, Cafeteria, Facility for indoor games, Gymnasium / Gymkhana Facility,. | Yes | Adequate |
| 15 | **Hostel Facility:** Boys (UG), Girls (UG), Interns, Canteen Facility, Warden/ Rector, Hygiene, etc. [Note: Verify Canteen Facility is monitored as per MUHS Circular No.18/2019 dated 19/03/2019.] | Yes | Adequate |
| | • **As per Central Council Norms/ University Norms, above Infrastructure must be available at College and all information with photographs must be uploaded on College Website.**<br>• **If Infrastructure is available, then mark "Adequate" & do not attach any documents.**<br>• **In case of "Inadequate", it must be marked as "Inadequate" with documentary evidence.** | | |

## HOSPITAL

| 16 | **Hospital Details** | **Details on College Website** | **Adequate/ Inadequate** |
|---|---|---|---|
| | **Name of the Hospital : Shri Prakashchand Jain Multi-Speciality Hospital** | Yes | Adequate |
| | **Bed Strength :** | | |
| | Number of beds registered as per BNH act: | | |
| 17 | **Clinical Facilities : Parent / Attached Hospital (Govt./Civil/Private) Must be within 10km. radius of the College** | | |
| a. | **Total built up area of Hospital (in Sq.Ft.) : 4092.98 sq/mtr** | Yes | |
| b. | **Whether Hospital is registered under any act under Local Authority such as Corporation, Municipality, Gram Panchayat etc.: (Please attach copy of registration certificate)** | Yes | Adequate |
| c. | **Whether Casualty is available and functional :** | Yes | Adequate |
| 18 | **Required Beds (UG & PG) Indoor and Outdoor Facility** (as per M.S.R.) | | |
| 19 | **Ambulances :** Owned, Hired | | |
| | Any other | | |
| | • **As per Central Council Norms/ University Norms, above Infrastructure must be available at College and all information with photographs must be uploaded on College Website.**<br>• **If Infrastructure is available, then mark "Adequate" & do not attach any documents.**<br>• **In case of "Inadequate", it must be marked as "Inadequate" with documentary evidence.** | | |

**Dean/ Principal Stamp & Signature**

PRINCIPAL
Shri. Prakashchand Jain College
of Physiotherapy & Research
Palaskhede (Bk.) Tal.Jamner
Dist.Jalgaon (MS) Pin-424206

Shri Prakashchand Jain College of Physiotherapy & Research, Palaskhede Bk. Tal.Jamner Dist.Jalgaon

Scanned with OKEN Scanner

[विशेष–ध. आ. (मुं. सा. वि.) २-म.

84

सत्यमेव जयते

# नोंदणीचे प्रमाणपत्र

याद्वारे प्रमाणपत्र देण्यात येते की, खाली वर्णन केलेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था ही आज, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० (सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २९) या अन्वये ..........सहाय्यक धर्मादाय आयुक्त, जळगांव प्रदेश, जळगांव.......... येथील सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी कार्यालयात योग्य रीतीने नोंदण्यात आलेली आहे.

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे नाव ....प्रकाशचंद जैन बहुउद्देशिय संस्था जामनेर ता० जामनेर जि० जळगाव....

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांच्या नोंदणी पुस्तकातील क्रमांक ....एफ-८३५८ (जळगाव)....

....श्री० राजकुमार प्रकाशचंद कावडीया.... यांस प्रमाणपत्र दिले.

आज दिनांक २४/८/२००८ रोजी माझ्या सहीनिशी दिले.

शिक्का

सही ............

पदनाम सहाय्यक धर्मादाय आयुक्त
जळगांव प्रदेश, जळगांव.

शा.फो.झिं.मु. पुणे-सिए/२५०-(१००पुस्तके)-९-०५

क्रमांक 091

सत्यमेव जयते

# नोंदणी प्रमाणपत्र

**संस्था नोंदणी अधिनियम, १८६०**

**(१८६० चा अधिनियम २१)**

नोंदणी क्रमांक महा-१०३२४/जळ

याद्वारे असे प्रमाणित करण्यात येते की, प्रकाशचंद जैन बहु.उद्देशिय संस्था, जामनेर ता. जामनेर जि. जळगांव

खालील तारखेस संस्था नोंदणी अधिनियम, १८६० (सन १८६० चा अधिनियम २१) अन्वये योग्यरीत्या नोंदणी करण्यात आली.

तारीख : 22/06/2005 ~~२०~~ रोजी माझ्या सहीनिशी दिले.

(सही)

अध्यक्ष संस्था निबंधक
संस्थाचे सहायक निबंधक

विभाग

(सही)
वरिष्ठ लिपिक
सा.न्या.नों.कार्यालय
जळगांव

# रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट

दि बॉम्बे नर्सिंग होम्स रजिस्ट्रेशन ॲक्ट १९४९ व सुधारित २००६ चे कलम ५ (नियम ५) अन्वये दिलेले

## CERTIFICATE OF REGISTRATION

*Under section 5 of the Bombay Nursing Homes Registration Act ,1949*
*(Under Rule 5)*

क्रमांक No : 147

दि बॉम्बे नर्सिंग होम्स रजिस्ट्रेशन ॲक्ट सुधारीत २००६ अन्वये श्री. ***प्रकाशचंद जैन बहुउददेशिय संस्था संचलीत श्री प्रकाशचंद जैन मल्टीस्पेशालीटी हॉस्पीटल गट नं. ८६/१/२, मौजे पळासखेडे बु.ता.जामनेर, जि.जळगाव*** येथील हॉस्पीटल हे नर्सिंग होम/मॅटर्निटी रजिस्टर केले असून सदरचे नर्सिंग होम/मॅटर्निटी होम ***डॉ. सागर धनसिंग पाटील*** यांचे निरीक्षणात चालविण्यास परवाना देण्यात येत आहे.

This is certify that ***Shri Prakashchand Jain Bahuddeshiya Sanstha Sanchalit Shri Prakashchand Jain Multi-Speciality Hospital*** situated at ***G.No. 86/1/2 Palaskhede Bk., Tal. Jamner, Dist. Jalgaon.*** has been registered under the Bombay Nursing Homes Registration Act, Amendment 2006, under the inspection of ***Dr. Sagar Dhansing Patil*** and has been authorised carry on the Nursing Home.

| | | | |
|---|---|---|---|
| रजिस्ट्रेशन क्र | : १४७ | प्रसुतीसाठी | : २२ कॉटस |
| Registration No | : 147 | Maternity | : 22 Cots |
| रजिस्ट्रेशन दि. | : ०१/०६/२०२० | इतर रुग्णांसाठी | : १७८ कॉटस |
| Date of Registration | : **01/06/2020** | Other Paitents | : 178 Cots |

Place : *Palkskhede Bk. Tal.Jamner, Dist. Jalgaon*

Date of issue of Certificate: 28/07/2020
सर्टीफिकेटची मुदत - ३१ मार्च २०२३
This Certificate shall be valid Upto **31 March 2023.**

जिल्हा आरोग्य अधिकारी
**DISTRICT HEALTH OFFICER**
**ZILHA PARISHAD JALGAON**

*प्रत्येक क्षयरुग्णाची माहीती जवळच्या शासकिय रुग्णालयात कळविणे बंधणकारक राहील*

U38/2120

# प्रकाशचंद जैन बहुउद्देशीय संस्था जामनेर ता.जामनेर जि.जळगांव

Esh 3

फ/9369

-: विधानपत्र ( संस्थापन समयालेखा ) :-

१. संस्थेचे नांव :- प्रकाशचंद जैन बहुउद्देशीय संस्था जामनेर ता.जामनेर जि.जळगांव

२. संस्थेचा पत्ता :- द्वारा. श्री.प्रकाशचंद हुकुमचंद ओसवाल्‌ता.जामनेर ता.जामनेर जि.जळगांव

३. संस्थेचे उद्देश :-

१. शिक्षणांचा सर्वांगिण विकास व उन्नती करण्यासाठी प्रयत्न करणे. त्यासाठी बालवाडी प्राथमिक, माध्यामिक, कला, वाणिज्य, विद्यी, वैद्यकीय, कृषी, क्रिडा, विद्यालय / महाविद्याल सुरू करणे.

२. आश्रमशाळा, प्रौढ शिक्षण वर्ग,वसतीगृह, बालसंगोपन व बालसंस्कार केंद्र, मुकबधिर अंध, अपंग विद्यार्थ्यासाठी शाळा सुरू करणे.

३. ग्रामिण भागातील महिला, विद्यार्थी, मुले / मुली यांच्या संगणक साक्षरतेच्या दृष्टीने उच्य तंत्र शिक्षण, माहिती व तंत्रज्ञान संगणक टंकलेखन, शिवणकला, विणकला, प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करणे.

४. औधोगिक प्रशिक्षण संस्था, कृषी पदवी व पदविका( डि.एड.) अध्यापक विद्यालय, शिक्षणशास्त्र (बी.एड.) महाविद्यालय, पशुवैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करणे. तसेच अल्पसंख्याक समाजाचे उन्नती करण्यांसाठी प्रयत्न करणे.

५. शारिरीक, मानसिक व सामाजीक दृष्टया अपंग विकलांग घटकांच्या उन्नती व विकासासाठी कल्याणकारी योजना सुरू करणे. अंध, मतीमंद, मुकबधिर,अस्तिव्यंग व बहुविकलांग कार्यशाळा सुरू करणे.

६. महिला व बालके यांच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने योजना व कार्यक्रम राबविणे. विधवाश्रम, वृध्दाश्रम, अनाथालये, बालकाश्रम सुरू करणे.

७. विविध खेळांचे प्रशिक्षण देणे, खेळांच्या स्पर्धा आयोजीत करणे, सदृढ निरोगी आरोग्यासाठी व्यायामशाळा, आरोग्यकेंद्र, योगाभ्यासवर्ग, जिमनॅस्टीक, बालका साठी गेमसेंटर, ज्युडो कराटे प्रशिक्षण, धनुर्विद्या, मलखांब, वजन उचलणे, शरीर सौष्ठव इ. खेळांचे प्रशिक्षण देणे.

८. खदीग्रामोद्योग, जिल्हा उद्योग केंद्र, राज्यशासन तथा केंद्रशासनार्तंगत योजना राबवून गरीब, अनाथ, विधवा, विकलांग, अल्पसंख्यांक, मागासवर्गीयांच्या पुर्णवसनासाठी प्रयत्न करणे आणि गरीब होतकरु विद्यार्थ्यांना शैक्षणीक कार्यासाठी मदत करणे. तसेच आर्थिक दुर्बल घटकांना शासनाच्या योजनासंबंधी माहिती उपलब्ध करुन देणे.

९. सामाजिक प्रबोधनासाठी स्त्रीमुक्ती चळवळ, हुंडा प्रतिबंधक, ग्रामिण व शहरी भागात आदर्श गांव, पंचायत राज, सडक योजना, जवाहर ग्राम समृध्दी, ग्रामीण पाणी पुरवठा, ग्राम स्वयंरोजगार, अन्नपूर्णा, सारख्या शासनाच्या योजना राबविणे.

Kawdiya R.P. | सौ.शकुंतला प्रकाशचंद कावडीया | 
अध्यक्ष | उपाध्यक्ष | सेक्रेटरी

Scanned with OKEN Scanner

१०. आरोग्यविषयक शिबीरे आयोजीत करणे. व्यसनमुक्ती, दारूबंदी संस्कार मार्गदर्शन शिबीर आयोजीत करणे. निसर्गोपचार, व्यसनमुक्ती केंद्र, कुटुंब नियोजन व कुटुंब कल्यान वैगरे योजना सुरू करणे.

११. नैसर्गिक आपतकालीन संकटग्रस्त गरजू व दुर्बल घटकांना आवश्यक ती वैद्यकीय तथा अन्य स्वरूपांत मदत करणे.

१२. गोपालन करणे. तसेच त्यासाठी गौशाळा सुरू करणे.

४. प्रकाशचंद जैन बहुउद्देशीय संस्था जामनेर ता.जामनेर जि.जळगांव या संस्थेचे नियम व निर्बंधाप्रमाणे संस्थेचा कारभार पहाण्यांची जबाबदारी ज्या संस्थापक सभासदावर सोपविण्यांत आली त्या प्रथम कार्यकारी मंडळातील सभासदांची संपुर्ण नांवे, पत्ते, हुद्दे, वय, व्यवसाय व राष्ट्रीयत्व खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. संपूर्ण नांव | पत्ता | हुद्दा | व्यवसाय | वय | राष्ट्रीयत्व |
|---|---|---|---|---|---|
| १. श्री.राजकुमार प्रकाशचंद कावडीया | रा.जामनेर ता.जामनेर जि.जळगांव | अध्यक्ष | व्यापार | ३८ | भारतीय |
| २. ~~सौ.शकुंतला प्रकाशचंद कावडीया~~ श्री. प्रकाशचंद कुंकुमचंद ओस्तवाल | रा.जामनेर ता.जामनेर जि.जळगांव | उपाध्यक्ष | ~~गृहीणी~~ | ५८ | भारतीय |
| ३. श्री.मनोजकुमार प्रकाशचंद जैन | रा.जामनेर ता.जामनेर जि.जळगांव | सेक्रेटरी | व्यापार | ३६ | भारतीय |
| ४. श्री.अशोक चंपालाल तालेरा | रा.जामनेर ता.जामनेर जि.जळगांव | सह सेक्रेटरी | व्यापार | ३७ | भारतीय |
| ५. ~~सौ.गुणवंती राजकुमार कावडीया~~ श्री. शैलेश कांतिलाल ललवाणी | रा.जामनेर ता.जामनेर जि.जळगांव | खजीनदार | ~~गृहीणी~~ | ३६ | भारतीय |
| ६. श्री.अभय प्रेमचंद कावडीया | रा.जामनेर ता.जामनेर जि.जळगांव | सदस्य | व्यापार | ३२ | भारतीय |
| ७. सौ.सविता मनोजकुमार जैन | रा.जामनेर ता.जामनेर जि.जळगांव | सदस्य | गृहीणी | ३४ | भारतीय |
| ८. श्री.संतोष मेघराज संचेती | रा.जामनेर ता.जामनेर जि.जळगांव | सदस्य | व्यापार | ३८ | भारतीय |
| ९. ~~श्री.सुनिल चंपालाल जैन~~ श्री. रितेश प्रविण चोपडा | रा.जामनेर ता.जामनेर जि.जळगांव | सदस्य | व्यापार | ३५ | भारतीय |

Kawadiya R.P. — सौ.शकुंतला प्रकाशचंद कावडीया

अध्यक्ष | उपाध्यक्ष | सेक्रेटरी

Scanned with OKEN Scanner

५. आम्ही खाली सहया करणार **प्रकाशचंद जैन बहुउद्देशीय संस्था जामनेर ता.जामनेर जि.जळगांव** चे सदस्य जाहीर करतो की, संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये अभिप्रेत असलेली संस्था अस्तित्वात आणण्यांची आमची इच्छा असून वरील उद्देशाने आम्ही एकत्र येऊ **प्रकाशचंद जैन बहुउद्देशीय संस्था जामनेर ता.जामनेर जि.जळगांव** हि संस्था आज दिनांक १.९.२००७ रोजी स्थापन केली असून ती संस्था नोंदणी संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंद करण्यांसाठी आम्ही या विधानपत्रावर सहया केल्या आहेत.

| अ.क्र. संपूर्ण नांव | सहया |
|---|---|
| १. श्री.राजकुमार प्रकाशचंद कावडीया | Kawdiya R.P. |
| २. ~~सौ.शकुंतला प्रकाशचंद कावडीया~~ श्री. प्रकाशचंद हुकूमचंद ओस्तवाल | सौ.शकुंतला प्रकाशचंद कावडे |
| ३. श्री.मनोजकुमार प्रकाशचंद जैन | [signature] |
| ४. श्री.अशोक चंपालाल तालेरा | [signature] |
| ५.सौ.~~गुणवंती राजकुमार कावडीया~~ श्री. शैलेश कांतिलाल ललवाणी | [signature] S.Shlwani |
| ६.श्री.अभय प्रेमचंद कावडीया | [signature] |
| ७. सौ.सविता मनोजकुमार जैन | [signature] |
| ८.श्री.संतोष मेघराज संचेती | S.M. Sancheti |
| ९.~~श्री.सुनिल चंपलाल जैन~~ श्री. रितेश प्रविण चोपडा | [signature] R.P. Copada |

ठिकाण : जामनेर

दिनांक : १७.९.२००७

वरील सहया करणा-या इसमांना मी ओळखतो त्यांनी माझे समक्ष या विधानपत्रावर स्वाक्ष-या केल्या आहे.

EXECUTIVE MAGISTRATE JAMNER

विशेष कार्यकारी दंडाधिकारी / वकील / नोटरी

TRUE COPY

[stamps: तहसिलदार जामनेर जि. जळगांव; सहायक धर्मादाय आयुक्त जळगांव]

Scanned with OKEN Scanner

परिशिष्ट क

प्रकाशचंद जैन बहुउद्देशीय संस्था जामनेर ता.जामनेर जि.जळगांव
या संस्थेची नियम व नियमावली

१. नियमावलीतील संदर्भीय शब्दांची व्याख्या :-

संस्था म्हणजे प्रकाशचंद जैन बहुउद्देशीय संस्था जामनेर ता.जामनेर जि.जळगांव असे समजले जाईल.

अध्यक्ष म्हणजे प्रकाशचंद जैन बहुउद्देशीय संस्था जामनेर ता.जामनेर जि.जळगांव या संस्थेचा अध्यक्ष असे समजण्यांत येईल.

उपाध्यक्ष म्हणजे प्रकाशचंद जैन बहुउद्देशीय संस्था जामनेर ता.जामनेर जि.जळगांव या संस्थेचा उपाध्यक्ष असे समजण्यांत येईल.

सेक्रेटरी प्रकाशचंद जैन बहुउद्देशीय संस्था जामनेर ता.जामनेर जि.जळगांव या संस्थेचा सेक्रेटरी असे समजण्यांत यईल.

सहसेक्रेटरी म्हणजे प्रकाशचंद जैन बहुउद्देशीय संस्था जामनेर ता.जामनेर जि.जळगांव या संस्थेचा सहसेक्रेटरी असे समजण्यांत येईल.

खजिनदार म्हणजे प्रकाशचंद जैन बहुउद्देशीय संस्था जामनेर ता.जामनेर जि.जळगांव या संस्थेचा खजिनदार असे समजण्यांत येईल.

कार्यकारी मंडळाचा सभासद प्रकाशचंद जैन बहुउद्देशीय संस्था जामनेर ता.जामनेर जि.जळगांव या संस्थेचा कार्यकारी मंडळात असलेला सभासद असे समजण्यांत येईल.

सर्वसाधारण सभेचा सभासद म्हणजे प्रकाशचंद जैन बहुउद्देशीय संस्था जामनेर ता.जामनेर जि.जळगांव या संस्थेचा कोणत्याही प्रकारचा सभासद म्हणजे त्याला सर्वसाधारण सभेचा सभासद असे समजण्यांत येईल.

संस्थापक सभासद म्हणजे प्रकाशचंद जैन बहुउद्देशीय संस्था जामनेर ता.जामनेर जि.जळगांव या संस्थेच्या विधानपत्र,नियम व नियमावलीवर सहया केलेल्या आहेत अशा सभासदास संस्थापक सभासद समजले जाईल.

२. कार्यक्षेत्र :- या संस्थेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्यापुरते मर्यादीत राहिल.

३. हिशोबाचे वर्ष :- या संस्थेचे हिशोब वर्ष १ एप्रील ते ३१ मार्च अखेर असे राहिल.

Kawalinar R.P

अध्यक्ष

सौ.शकुंतला प्रकाशचंद कावडीया

उपाध्यक्ष

सेक्रेटरी

Scanned with OKEN Scanner

४. **सभासदत्व व त्याची नोंदणीची पध्दत :-**

कोणत्याही वय वर्षे १८ असलेल्या भारतीय स्त्री / पुरूषाला या संस्थेचे सभासदत्व प्राप्त करता येईल. त्याकरीतां तिला / त्याला संस्थेकडे रितसर अर्ज करावा लागेल. आलेल्या अर्जाला कार्यकारी मंडळाने मंजूरी दिल्यावर सभासदाची निर्धारीत वर्गणी संस्थेत जमा केल्या नंतर त्याची नोंदणी सभासद यादीमध्ये करण्यांत येईल.

५. **सभासदांचे प्रकार :-** सभासदांचे प्रकार पुढील प्रमाणे असतील.

१. आजिव सभासद :-जे सभासद संस्थेला रू.५०१/- रूपये पांचशे एक मात्र एक रक्कमी देतील त्यांना आजिव सभासद संबोधण्यांत येईल.
२. सामान्य सभासद :-जे सभासद संस्थेला रू.२०१/- रूपये दोनशे एक मात्र वार्षिक वर्गणी देतील त्यांना सामान्य सभासद संबोधण्यांत येईल.
३. संस्थापक सभासद:- ज्या व्यक्तींनी रू.२०१/- सभासद वर्गणी दिली असून, संस्थेच्या विधानपत्र, नियम व नियमावलीवर सहया केल्या आहेत. अशा सभासदास संस्थापक सभासद समजण्यांत येईल.

६. **सभासदत्व रद्द होणे :-**

कोणीही सभासद कायदेशिर गुन्हेगार ठरला असेल. मुदतीत निर्धारीत सभासद वर्गणी दिली नसेल. मरण पावला असेल. देश सोडून कायम वास्तव्यासाठी परदेशात गेला असेल. व्यसनी असेल किंवा गैरवर्तन करीत असेल. संस्थेला नुकसान पोहचवित असेल. असे निदर्शनास आल्यास किंवा अन्य कारणावरून कार्यकारी मंडळाने बहुमताने ठराव मंजूर करून काढून टाकल्यास त्या सभासदाचे सभासदत्व रद्द झाले असे समजण्यांत येईल.

७. **सर्वसाधारण सभा, तिचे अधिकार व तिचे कार्य :-**

सर्वसाधरण सभा ही संस्थेची सर्वश्रेष्ठ व शेवटचा निर्णय देणारी सभा म्हणून समजण्यात येईल. ही सभा वर्षातून एक वेळा तरी घेतली पाहीजे या सभेत सर्वप्रकारचे सभासद भाग घेऊ शकतील. कार्यकारी मंडळाने चालविलेल्या कार्यावर नियंत्रण ठेवणे वार्षिक हिशोब मंजूर करणे, पूढील नवीन वर्षाचे अंदाज पत्रकाला मंजूरी देणे, सनदी लेखापरिक्षकाची नेमणूक करणे तसेच आवश्यकतेनुसार नियमात बदल करणे. कार्यकारी मंडळाच्या व पदाधिका-यांची निवड करणे, वेळेवर येणा-या ठरावावर निर्णय देणे.

Kawalina R.P. | सौ. शकुंतला प्रकाशचंद कावडीया

अध्यक्ष | उपाध्यक्ष | सेक्रेटरी

Scanned with OKEN Scanner

सेक्रेटरी :- संस्थेच्या सभा बोलविणे. सस्थेचा पत्र व्यवहार करणे. तक्रारीचे निवारण करणे. संस्थेच्या कर्मचा-यांवर लक्ष ठेवणे. किरकोळ नियम तयार करणे. संस्थेच्या दृष्टीने आवश्यक ते न्यायालयीन कामे, वार्षिक हिशोबाची पत्रके साधारण सभेपूढे मंजूरीस्तव ठेवणे संस्थेच्या मालमत्तेची देखभाल करणे. मंजूर झालेले ठराव अंमलात आणणे. संस्थेचे हितार्थ अन्य कामे करणे.

सहसेक्रेटरी :- सेक्रेटरीच्या गैरहजेरीत सेक्रेटरीची कामे करणे अन्यथा सेक्रेटरींना संसथेच्या कामात आवश्यक ती मदत करणे व सहकार्य करणे.

खजीनदार :- संस्थेच्या आर्थिक परिस्थितीवर नियंत्रण ठेवणे. हिशोब लिहीणे अगर लिहून घेणे. दैनंदीन हिशोब तपासून त्यावर सहया करणे. खर्चाची बिले मंजूर करणे. हिशोब पूर्ण झाल्यावर कार्यकारी मंडळापुढे मंजूरीस्तव ठेवणे. हिशोबाच्या पुस्तकातून वार्षिक पत्रके तयार करणे. रक्कमांची देवाण घेवाण करणे. हिशोब तपासणीस यांनी हिशोब तपासतांना काढलेल्या तृटीची पुर्तता करणे

कार्यकारी मंडळाचे इतर सभासद :- कार्यकारी मंडळाच्या सभेत व सर्वसाधारण सभेत उपस्थित राहणे. निवडणूकीचे वेळी मतदान करणे. संस्थेच्या कामात इतर पदाधिका-यांना मदत करणे.

इतर सभासद :- सर्वसाधारण सभेत उपस्तित राहणे. निवडणूकीच्या वेळी मतदान करणे व संसथेच्या कामात पदाधिका-यांना आवश्यक ती मदत करणे.

१३. **कार्यकारी मंडळाची सभा व मागणी सभा :-**

कार्यकारी मंडळाच्या वर्षातून कमीत कमी तीन सभा घेण्यांत येतील. संस्थेच्या कोणत्याही सभासदांनी मागणी केल्यास अध्यक्षांनी किंवा सचिवांनी कार्यकारी मंडळाची सभा मागणी केल्यापासून पंधरा दिवसाच्या आत बोलविण्याचे बंधन राहील. मागणीच्या सभेला कार्यकारी मंडळाचे सर्व अधिकार रहातील.

१४. **कार्यकारी मंडळाच्या सभेची सुचना व गणसंख्या :-**

कार्यकारी मंडळाच्या सभेची सुचना तीन दिवस अगोदर देणे आवश्यक राहील. सुचनेमध्ये दिनांक, वेळ, ठिकाण व सभेचे विषय नमुद करणे आवश्यक राहील. सुचना संस्थेच्या डाकबुकात सही घेऊन अथवा टपालद्वारे रजि.पोस्टाने पाठविता येईल. कार्यकारी मंडळाचे २/३ सभासद उपस्तित झाल्यास गणसंख्या पुर्ण झाली असे जमजण्यांत येईल.

Kawadiwa R-P | सौ.शकुंतला प्रकाशचंद कावडीया | MS

अध्यक्ष | उपाध्यक्ष | सेक्रेटरी

Scanned with OKEN Scanner

१५. **कार्यकारी मंडळाचे निवडणुकीचे नियम :-**

सर्वसाधारण सभा ठरवील त्याप्रमाणे राहील. ज्या सभासदांकडे संस्थेची कोणतीही रक्कम येणे बाकी आहे. अशा सभासदाला निवडणुकीत उमेदवार म्हणून उभे राहता येणार नाही तसेच मतदान करण्याचा हक्क राहणार नाही.

१६. **कार्यकारी मंडळाचे रिक्त पदे भरण्याबाबत :-**

कोणतेही कारणास्तव कार्यकारी मंडळातील पद / पदे रिक्त झाल्यास उरलेल्या कार्यकारी मंडळाच्या पदाधिका-यांना रिक्त पद / पदे उर्वरीत कालावधीसाठी बहुमतांने भरता येतील.

१७. **कार्यकारी मंडळाचे अधिकार व कर्तव्य :-**

कार्यकारी मंडळ संस्थेच्या सर्व कारभारावर नियंत्रण ठेवतील.सर्व साधारण सभेने मंजूर केलेल्या ठरावाची अंमलबजावणी करून पूर्तता करतील. संस्थेचे काम सुचना रुपाने चालावे म्हणून किरकोळ नियम तयार करतील. आवश्यकतेनुसार त्यात बदल करु शकतील. तसेच एखाद्या कार्याक्रीता समिती /उपसमिती नियुक्त करु शकतील तसेच त्यांच्याकडून हिशोब व माहीती वेळोवेळी घेऊ शकतील. तसेच कार्य समाप्तीनंतर समिती/उपसमिती रद्द करु शकतील. संस्थेच्या शाखा कार्यालयास मान्यता देणे. संस्थेवर असलेल्या सर्व कायदेशीर बाबी पूर्ण करणे. हिशोबावर नियंत्रण ठेवणे, तक्रारीची दखल घेणे व निवारण करणे. कार्यकारी मंडळातील रिक्त पद अथवा पदे भरणे, सेवकांच्या नियुक्त्या करणे. त्यांना काढून टाकणे. तसेच अन्य आवश्यक ती सर्व कामे करणे. बहुमताने मंजूर झालेला ठराव कायदेशिर ठरवून अंमलात आणणे.

१८. **संस्थेचा निधी, मिळकत व तिचा विनियोग :-**

सभासद फी, देणगी, वर्गणी, अनुदान, स्थावर व जंगम मालमत्तेपासून येणारे उत्पन्न इ. संस्थेच्या उत्पनांची साधने रहातील. संस्थेचे उद्देश पुर्तीकरीतां निधी गोळा करतां येईल वतो स्थावर स्वरूपाच्या मिळकतीसाठी गुंतविता येईल. याप्रकाच्या मिळकतीची नोंद सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयात बदल अर्ज देऊन त्यांच्याकडे असलेल्या नोंद रजिस्टरला करून घ्यावी लागेल.

१९. **उद्दीष्ट निहाय खर्चाची तरतुद (टक्केवरी प्रमाणे) :-**

शैक्षणीक उद्देशावर ५० % व धर्मादायी उद्देशावर ५० % खर्च करतां येईल.

Kamolikar P.P. — अध्यक्ष

Swati P.Y. / सौ. शकुंतला प्रकाशचंद कोवडीया — उपाध्यक्ष

सेक्रेटरी

Scanned with OKEN Scanner

२०. कर्ज किंवा ठेवी या संबंधीची तरतुद :-

संस्थेला आवश्यकता वाटल्यास कोणत्याही व्यक्तीकडून अथवा बँकेकडून कर्ज किंवा ठेवी स्विकारता येतील. त्याकरीत मा.धर्मादाय सह आयुक्त नासिक विभाग, नासिक यांची पुर्व परवानगी घेणे आवश्यक राहिल.

२१. स्थावर मालमत्ता खरेदी, विक्री करण्यांबाबतची तरतुद :-

संस्थेला स्थावर मालमत्ता खरेदी करणे. तसेच विक्री करण्यांचा अधिकार राहिल. संस्थेला त्या करीतां कार्यकारी मंडळाची बहुमतांने संमती घ्यावी लागेल. संस्थेची स्थावर मालमत्ता विक्री करावयाची असल्यास ती विकण्यांपुर्वी मा.धर्मादाय सह आयुक्त नासिक विभाग, नासिक यांची पुर्व परवानगी घेणे आवश्यक राहिल.

२२. बँक खाते :-

संस्थेला निकटवर्ती तारखेवर खर्च करवी न लागणारी शिल्लक रक्कम ठेवण्यांसाठी राष्ट्रीयकृत किंवा मान्यताप्राप्त बँकेत (शेडयुल) संस्थेच्या नांवे ठेवता येईल. ती अध्यक्ष, सेक्रेटरी व खजिनदार या तीन पदाधिका-यापैकी कोणाही दोघांच्या संयुक्त सहीने काढता येईल. मात्र अध्यक्षाची सही आवश्यक राहील.

२३. सभासदांची यादी ठेवण्यांची पध्दत :-

सन १८६० च्या संस्था नोंदणी अधिनियमातील कलम १५ अ प्रमाणे जे संस्थेचे सभासद असतील त्यांची एक यादी सन १९७१ चे संस्था नोंदणी महाराष्ट्र नियमातील नियम १५ प्रमाणे अनुसूची सहाचे नमुण्यांत ठेवण्यांत येईल.

सन १८६० च्या संस्था नोंदणी अधिनियमातील कलम ४ प्रमाणे व सन १९७१ चे संस्था नोंदणी महाराष्ट्र नियमातील नियम १५ प्रमाणे दर वर्षी कार्यकारी मंडळाची यादी अनुसुची एकच्या नमुण्यांत आपले विभागाचे सहायक संस्था निबंधक यांचे कार्यालयात पाठवावी लागेल.

सन १८६० च्यां संस्था नोंदणी अधिनियमातील कलम १५ अ प्रमाणे व सन १९७१ चे संस्था नोंदणी महाराष्ट्र नियमातील नियम ८ प्रमाणे दर वर्षी संस्थेत नोकरीस लावलेल्या व्यक्तींच्या नोकरीसंबंधी अटीबाबतचे विवरण अनुसुची दोनच्या नमुण्यांत आपले विभागाचे सहायक संस्था निबंधक यांचे कार्यालयात पाठवावी लागेल.

Kawdiya R.P.

सौ.शकुंतला प्रकाशचंद कावडीया

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सेक्रेटरी |
| --- | --- | --- |

Scanned with OKEN Scanner

२४. **नियम व नियमावलीतील बदल करण्यांची तरतुद :-**

संस्थेच्या नियम व नियमावलतील बदल करावयाचा असल्यास सर्वसाधारण सभेत उपस्थीत सभासदांच्या २/३ बहुमतांने ठराव करून नियम व नियमावलीतील बदल करता येईल. सन १८६० च्या संस्था नोंदणी अधिनियमातील कलम १२ प्रमाणे कार्यवाही पुर्ण करावी लागेल.

२५. **संस्थेच्या नांवात किंवा उद्देशात बदल करण्यांबाबतची तरतुद :-**

संस्थेच्या नांवात किंवा उद्देशात बदल करावयाचा असल्यास अथवा दोन संस्थांचे विलीनीकरण करावयाचे असल्यास सन १८६० च्या संस्था नोंदणी अधिनियमातील कलम १२ अथवा १२ अ प्रमाणे कार्यवाही पुर्ण करावी लागेल.

२६. विसर्जन :-

संस्थेचे कार्य बंद करावयाचे असल्यास ३/५ सभासदांच्या बहुमतांने सर्वसाधारण सभेत मंजूरी घ्यावी लागेल. संस्थेचे सर्व प्रकारचे देणे / घेणे बाबतचे व्यवहार पुर्ण करावे लागतील. तसेच संस्थेची शिल्लक असेलेली मालमत्ता अन्य दुस-या संस्थेला दान म्हणून देता येईल. सन १८६० च्या संस्था नोंदणी अधिनियमातील कलम १३ अथवा १४ प्रमाणे संस्था विसर्जनाची कार्यवाही पुर्ण करावी लागेल.

## दाखला

प्रमाणीत करण्यांत येते की प्रकाशचंद जैन बहुउद्देशीय संस्था जामनेर ता.जामनेर जि.जळगांव या संस्थेच्या नियम व नियमावलीची सत्य प्रत आहे.

| अ.क्र. | सभासदांचे नांव | पद | सहया |
|---|---|---|---|
| १. | श्री.राजकुमार प्रकाशचंद कावडीया | अध्यक्ष | Kawdiya R. P. |
| २. | ~~सौ.शकुंतला प्रकाशचंद कावडीया~~ श्री. प्रकाशचंद हुकुमचंद ओस्तवाल | उपाध्यक्षा | सौ.शकुंतला प्रकाशचंद कावडी |
| ३. | श्री.मनोजकुमार प्रकाशचंद कावडीया | सेक्रेटरी | MC |

ठिकाण: जामनेर

दिनांक : १०.९.२००७

TRUE COPY

अधिक्षक

सार्वजनीक न्यास नोंदणी कार्यालय जळगाव विभाग जळगाव

Scanned with OKEN Scanner